पुष्प गीत माला

कवी/ गायक

पी. टी. रोटे

सूचना : हे पुस्तक डॉ. आंबेडकर व गौतम बुद्ध यांच्या गीतांवर आधारीत आहे. यातील कोणत्याही त्रुटीस विनिमय प्रकाशन जबाबदार असणार नाही.

पुष्प गीत माला

लेखक
पी.टी. रोटे

सादर करीत आहे समाजसेवा
गायन पार्टी पंचशिल नगर नं. १
सारनाथ बुद्ध विहार अमर महाल
जी. एम. रोड. चेंबूर, मुंबई नं. ४०० ०८९

भाग - ३ रा, दि. ६-१२-२००९ रोजी
बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पहापरिनिर्वाण दिनानिमीत्त प्रकाशीत

या अगोदर भाग-१ ला पाळणा आणि भाग २ रा,
पुष्पगीतमाला १९८५
भाग ३ रा पुष्पगीतमाला २००९
पंचीस गीतांची पुस्तक मालिक घ्या.

पार्टीचा अल्प परिचय
कवी/गायक : पी.टी. रोटे (बौद्धाचार्य)
शाहीर : गोपीनाथ रोटे
गायक : भिमराव सोनावणे
हॉर्मूणीम संगीत : एकनाथ बोर्डे
ढोलकी वादळ : सुखदेव खंडीमराड
गायक : नेमीनाथ कातुरे
गायक : काशिनाथ वानखडे

किंमत : १५/-

मनोगत

भगवान गौतम बुद्ध, बोधीसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा जोतीबा फुले, संत कबीर यांच्या पवित्र विचारांस अभिवादन करुन.

रसिक, बंधू आणि भगिनींनो! आपणास आनंद वाटावा, सन्मान मिळवा. आपले प्रबोधन होईल अशी आशा धरुन पुष्प गीत माला पुस्तक आपल्या हाती देताना आनंद वाटतो. आपणास बौद्ध म्हणून जगायचं असेल तर बौद्ध धम्म माणसाला समजला पाहिजे. त्रिसरण, पंचशिलाचा अर्थ सजमला पाहिजे. धम्म माणसाला न्याय, निती, शहाणपण शिकवीतो. म्हणून पी. टी. रोटे (बौद्धाचार्य) याने लिहिलेली पुष्प गीत माला प्रचारासाठी योग्य आहे.

कवी गायकाने आपल्या शाहिरीतून जो समाज जागृत केला; त्याला तोड नाही. बाबासाहेबांनी शाहिराला जवळ केलं; त्याला संधी दिली, त्याचं गुणगौरव केले आणि म्हणाले, बंधु आणि भगिनींनो माझे दहा भाषणे आणि कवी गायकाचं एकच गीत समाजाचे प्रबोधन करु शकते. बाबासाहेबांचे हे शब्द ऐकता दलितनंद बाबा म्हणाले माझ्या डोळ्यातून अश्रू गळाले. प्रत्येक कवी, गायक बाबासाहेबांच्या सभेत आपली उपस्थिती दावून लोकांना आपले विचार गीतातून सांगायचे.

बाबासाहेबांच्या कार्यात सहभागी होऊन प्रचार करणारे काही गायक कलावंत कोण होते; त्याची आठवण म्हणून ठेवावी लागेल. १) वामनदादा कर्डक २) दलितानंद बाबा ३) लक्ष्मण राजगुरु ४) लक्ष्मण दादा केदार ५)श्रावण यशवंते ६) गोविंद म्हशीलकर ७) नवनीत खरे ज्यांच्या संगतीत राहून मला गीताचे लेखन करता आले. ते शाहीर आप्पाजी कांबळे ज्याने माझं लेखन तपासून रंगभूमी महापरिनिरक्षण मंडळ महाराष्ट्र शासनाकडे देऊन पास करुन मला सन्मान पत्र मिळवून दिले.

त्या सर्व कवी गायकांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनी दि. ६-१२-२००९ रोजी प्रकाशीत होत आहे. बहुजन हिताय! बहुजन सुखाय!! लोकानु कंपाय!!!

वंदन गीत

चाल : सोड वाट मुरलीधर

लावूनी दिप चंदना
करीतो बुद्ध वंदना ।।धृ।।

बुद्ध चरणी तल्लीन व्हावे
कर जुळूनी माथा नमावे
पुजूनी आपल्या मना (करीतो)।।१।।

त्रिसरणाला शरण जाता
धम्म नितीचे पालन करीता
झिजूनी रुपस्कंदना (करीतो) ।।२।।

एक चित्ताने लावू ज्योत
पाहू शोधून आपल्या घरात
करुनी ध्यान साधना (करीतो) ।।३।।

पंढरीनाथा येथे तरावे
सत् बुद्धीला जागी करावे
अर्पूनी तन मन धना (करीतो) ।।४।।

वंदन बाबा भिमाला

चाल : भिम माझा लई शिकला (रेकॉर्डप्रमाणे)

उद्धरीले ज्याने आम्हाला
वंदन बाबा भिमाला ।।धृ।।

शिकवण दिली आम्हा वागण्याची
पाजीली दवा, आम्हा जगण्याची
विसरु कसा त्याच्या नावाला ।।१।।

मागत होतो भिक्षा भिकाची
दिली आम्हाला रोजी सुखाची
सावलीत लावले कामाला ।।२।।

बदलून गेले कुजलेले घर
पोषाख आमचा साज शृंगार
उंचीवर राहतो माहडीला ।।३।।

पंढरीनाथ लिहितच राहील
गीत भिमाचे गातच राहील
अनुसरुण त्याच्या गुणाला ।।४।।

वैशाखी पौर्णिमा

चाल : जिसका मुझे था इंतजार

वैशाखी पौर्णिमेला जन्मले गौतमा गौतमा
पुजितो मी पुज्य गौतमा, पुजितो मी ।।धृ।।

मायावती प्रसूत झाली
लुंबिनीवन बहरुन गेली
असीतमुनीच्या बातमी कानी
सांगतो शुद्धोदना, शुद्धोदना ।।१।।

त्यागीले सारे राज्य सुखाचे
मुळ शोधिले जन दु:खाचे
बोधिवृक्षाखाली ज्ञान सत्याचे
उठले आसना, आसना ।।२।।

घडविला माणूस उपदेश देऊनी
सुखी शांत केले, जटाधारी मुनी
लागली गोडी अमृतावाणी
करुनी मुंडना मुंडना ।।३।।

बंदिवान आम्ही होतो कोठडीत
गौतमाने पेटवली, धम्माची ज्योत
पंढरीनाथा उडाली झाक
धम्माची कर गर्जना गर्जना ।।४।।

सुजाताची खीर

चाल : बुद्ध देवा तुझी ज्ञान गंगा

उरुवेलाच्या वटवृक्षाची
झाली पावन खीर सुजाताची हो ।।धृ।।

इनामदाराची सुजाता, पात्र घेऊन निघाली
पन्ना नावाच्या दासीने, खीर दुधाची वाहिली
उठा मुनी खीर घ्या आमची ।।१।।

खिरीचे पात्र घेऊनी, निरंजना नदीवर गेले
जीव व्याकुळलेला होता, अन्नाचे ग्रहण केले
केला संकल्प उलट्या दिशांनी ।।२।।

बुद्धगया बोधीवृक्ष, पाहिला त्याने तो साक्ष
बसले आसन टाकूनी, किलबील करीना पक्ष
भयानक रात्र धमकी भ्याडाची ।।३।।

गौतमाने ठेवीली जागृती, माराला दाविली क्रांती
उडविली पंढरीनाथा, ज्ञान तत्वाने भ्रांती
पराभूत झाली सेना माराची ।।४।।

माराशी युद्ध

चाल : जिव्हारी लागल्या

सिद्धार्थाचा पराभव करण्या सैन उठले
युद्ध पेटले युद्ध पेटले, युद्ध पेटले युद्ध पेटले ।।धृ।।

उभा राहून नम्रतेने, मारली सिद्धार्थ हाक
यशोधरा करिती शोक, नगरीचे सारे लोक
तोडीले सारे मोह मायाचे, झरे आटले ।।१।।

होते बोधिवृक्षाखाली, बसले आसन टाकूनी
माराने घोर युद्धाची, धमकी दिली दावूनी
तुफान वारा घाली फेरा, आकाश तुटले ।।२।।

जन्मो जन्मी पारमीता, आत्मसात केल्या दाही
साक्षात उभी राहूनी, देवता देते ग्वाही
सैन्य हरले माराला मारले, सारे पिटले ।।३।।

वैशाखी पौर्णिमेला, सिद्धार्थ झाले बुद्ध
पंढरीनाथा मिटले माराचे घोर युद्ध
सुख शांतीचा मार्ग शोधिला, निर्वाण गाठले ।।४।।

घरचे निमंत्रण

चाल : आपल्या पक्षाचा ऐक ना आवाज गं

सात वर्षे नाही झाली भेट
किती पाहू गौतमा तुझी वाट ।।धृ।।

भद्रजाच्या आश्रमा भोवती
जमली सारी नाती गोती
जा जा म्हणती निरोप देती
दिला सोडून राज्य शाही थाट ।।१।।

राजगृहाला चालत गेले
पर्वतावरती जाऊन बसले
बिंबीसाराने स्वयंदीप पाहिले
केला उपदेश चढूनिया घाट ।।२।।

उरवेलाच्या परिसरात
साधन साधन्या बसले निवांत
सुकली काया लागेना अंत
ध्यान देऊनी बसले ते घट्ट ।।३।।

लाभली दृष्टी ज्ञान मिळाले
सत् धम्माचे तत्व कळाले
पंढरीनाथा जन हे वळाले
प्रिय जनाशी देऊनी भेट ।।४।।

अंगुलीमाला डाकू झाला

चाल : त्रिसरणाची पंचशिलाची

अंगुलीमाला डाकू झाला, हातात घेतली तलवार
हजाराची गणती कराया, गळ्यात घातली त्याने माळ ।।धृ।।

दाट झाडीत वळणावरती, वाट सरुच्या वाटे वरती
हत्या करुनी निर्दय झाला, त्याला कळाली नाही वेळ
हजाराची गणती कराया, गळ्यात घातली त्याने माळ ।।१।।

विद्या शिकूनी परिपूर्ण झाला, गुरुची आज्ञा लाचारी झाला
ओळख नव्हती गुणवंतेची, पेटत होता क्रोध जाळ
हजाराची गणती कराया, गळ्यात घातली ।।२।।

अंगुलीमाला नव्हता ध्यानी, बुद्धाने मंत्र फुंकला कानी
विचार करता बसला खाली, टाकून दिली त्याने माळ
हजाराची गणती कराया, गळ्यात घातली ।।३।।

हिंसक होता अहिंसक झाला, बुद्धाने त्याला उपदेश केले
पंढरीनाथा अभय झाला, शांतमय झालेले पाहून स्थळ
हजाराची गणती कराया, गळ्यात घातली ।।४।।

मुला मुलीला शाळेत घाला

चाल : हाताला धरलया

जोतीबा फुले आंबेडकराने, कानात सांगलं या
कानात सांगलं या हो, आमच्या कानात सांगलं या ।।धृ।।

मुला मुलीला शिकवा शाळा, शिक्षण तिसरा डोळा
गुरुमंत्र आमचा पाळा, अधोगतीचा मार्ग टाळा
विद्याचं धन दिलया दान, जगात पांगलं या ।।१।।

दगडाचे केले देव, त्याचं तुम्हाला दावलं भेव
नका ठेऊ त्यांच्यावर भाव, का घेता दुज्याचे जीव
सोडूनी द्या हो जुन्या रुढीला सांगून गेले या ।।२।।

कोणी वकील बॅरिस्टर, कोणी झालेत कलेक्टर
नव्हता कोणाला अधिकार, हे कोणाचे उपकार
समाज सुधारक होऊन गेले, आम्हाला पावले या ।।३।।

मिळाला हाताशी हात, शाहू राजांनी दिली साथ
नाही केला पक्षापात, बंधू भावाचं जोडलं नातं
पंढरीनाथाने पाना पानापानातून शोधून काढलं या ।।४।।

नागपूरी धर्मांतर केले

चाल : नाच नाचूनी आता मी दमले

बाबा भिमाने चक्र फिरविले, नागपूरी धर्मांतर केले
होता कलंक मिटवाया, आलो येथे तुम्हाला सांगाया ।।धृ।।

येथे कोणी कशाची, धरु नका आस
धम्मावरी श्रद्धा ठेवा, सोडू नका कास
घाव किती सहन केले, दुर्गुणाला हटवाया ।।१।।

समाजात राहूनी, समाजात फिरले
सोर जुल्म अन्यायाच्या संकटात तरीले
कोणी नाही धावूनी आला, कैवार घेवाया ।।२।।

उपनयननाचे खुले केले द्वार
बाबाच्या पुण्याईने झाला उद्धार
पशुपरी अमंगळ होतो, लाविले सोडाया या ।।३।।

दाविला आम्हाला, गौतम बुद्ध
आता आम्ही कर्तव्यवान, झालो शुद्ध
पंढरीनाथा आला येथे गुण भिमाचे गावाया ।।४।।

भीमा सारखे कोणी करुन दाखवा

चाल : स्वतंत्र

धर्ममार्तंडाला रोखीले, येथे थांबवा
भीमासारखे कोणी, करुनी दाखवा ।।धृ।।

गुलामाला गुलामीची, जाणीव दिली
बदलली समाजाची, आकळा गेली
हक्कासाठी लढले ते, लढूनी दाखवा ।।१।।

होते विषमतेचे वादळ रोखीले
मनू कायद्याला, अग्नीत जाळले
जातीवाद मिटला ना, मिटवूनी दाखवा ।।२।।

जुल्म अन्यायाचे, बंधन तोडीले
किती गुन्हेगार, कायद्यानं सोडीले
संकटात तारीले ते तारूण दाखवा ।।३।।

सनातनी पंथाला आव्हान दिले
पंढरीनाथाला माणूस केले
देशात क्रांती केली ती करुनी दाखवा ।।४।।

हवा होत त्याला ते भेटले

चाल : तुझ्या जाळ्याला लाव गं टाकी

जेव्हा देशात वादळ उठलं
तेव्हा भिमाचं नेतृत्व पटलं ।।धृ।।

अस्पृश्यामधी भीमराव जन्मला
येड शिक्षणाचं, परदेशाला गेला
खूप वाचूनी अभ्यास केला
सेलिग्मनचा होऊनी चेला
हवा होतं त्याला ते भेटलं ।।१।।

कधी होणार नव्हते भिमाने ते केलं
जुल्मी अन्यायाचं बंधन तोडीलं
मनू कायद्याला जाळीलं
विषमतेचं रोप मोडीलं
होतं भ्रमाचं भोपळं फुटलं तेव्हा ।।२।।

मंत्री मंडळ मंडळ नवीन आलं
बाबासाहेबाचं साहेबानं कौतुक केलं
मोठ्या कष्टाने संविधान लिहिलं
दिल्ली दरबारी भाषण केलं
हे सर्वांना हिताचं वाटलं ।।३।।

होतं वादळ वादळ बेकीचं
केल आव्हान आव्हान एकीचं
पंढरीनाथा भाऊ भावाचं
नातं तुमचं आणि आमचं
जेव्हा स्वातंत्र सर्वांना भेटलं ।।४।।

भारतात बोधिसत्व जन्मास आला

चाल : देरे काना चोळी आणि लुगडी

कशी अगाध केलीस करणी
बोधिसत्वा बोधिसत्वा
कशी आगध केलीस करणी।।धृ।।

कण कण वेचूनी दिव्य ज्ञानाला
अर्पण केले या विश्वाला
दिशा दाविली आदि मानवाला
एकच वरणी ।।१।।

थोर पुरुषाने गौरव केले
तेव्हा जगाने बोधी वदले
बौद्ध धम्माचे दाखले दिधले
दाविले करुनी ।।२।।

शिल प्रज्ञा करुणा मय मुर्ती
पावन झाली आकाश धरती
जनू सागराला आली भरती
तारीले तरुणी ।।३।।

देह होता आमचा कुजलेला सारा
शिवूनी ठेवीला कुठे सुई दोरा
पंढरीनाथा शोधत होता
आस ती धरुनी ।।४।।

विषमतेच्या पेटत्या ज्वाला शांत केल्या

चाल : अहो राया तुम्ही पाऊसात नेऊ नाक

पेटत होत्या शांत केल्या विषमतेच्या ज्वाला
ज्ञानाचा सागर तो झाला ।।धृ।।

अडकले होते खोल कपारी
भयान रात्र होती अंधारी
संशोधन केले धावूनी आले
प्रकाश दाविला ज्ञानाचा ।।१।।

भविष्य काळाचे भविष्य कथिले
स्वप्न भिमाचे साकार झाले
थोर विचारी महापंडीताला
इशारा केला ।।२।।

हक्कासाठी लढता लढता
कधी ना भ्याला संघर्ष करता
कावाबाजी करणाराला
दम भरविला ।।३।।

राज्य करता समाजवादी
जिंकीली त्याने लावूनी बाजी
पंढरीनाथा तुला जगण्याचा
हक्क त्याने दिला ।।४।।

गरीबाचा राजा आंबेडकर

चाल : पोर चालत राही

गरीबामध्ये गरीब नेता, पुढारी ठरला पाचात
पाचात हो भीम तो माझा, लाखात ।।धृ।।

त्याने गाजविली गोलमेज परिषद हो परिषद
स्वतंत्र मिळवा संघ, भारत सारा भारत
लई घाईनं आलो, त्रासून गेलो त्रासून गेलो या जाचात ।।१।।

आला तारेचा कागद, हातात त्यांच्या हातात
झाला निकाल कायद्या कोर्टात हो कोर्टात
सारे जुटीनं आले पाणीच पेले, पेलेत सारे झोकात ।।२।।

लई हुशार गांधी सरकार ते सरकार
उपोषणाने घाबरलं दरबार जेल दरबार
पुणे करार केला आकात झाला आकात झाला चौकात ।।३।।

काळ्या रामाचे द्वार ठोकीले त्याने ठोकीले
ज्ञानी पंडीत सारे रोकीले तेथे रोकीले
छाती ठोकून सांगे पंढरीनाथा, पंथरीनाथा या लोकात ।।४।।

मनुस्मृती का जाळली?

चाल : नको गं नेसू सणाच्या दिनी

भिमाने एक एक पान चाळीले
जाळली मनुस्मृती जाळली ।।धृ।।

चार मजल्याची इमार होती
उच्चनिच्च होत्या, जाती पाती
मनूने समाजाची नाते तोडली ।।१।।

ब्राह्मण क्षत्रिय वैश्य कुळाला
शुद्र पायाखाली, घातला तळाला
मनूने माणसाला, तुच्छ मानीले ।।२।।

हक्कासाठी संघर्ष होता
मनू वाद्यांच्या विरुद्ध होता
तिचे ब्राह्मणाने पान तोडली ।।३।।

विषमतेची समाज रचना
पंढरीनाथा जळाली घटना
मनूच्या कपाळाला राख चोळली ।।४।।

इंग्लंडची गोलमेज परिषद

चाल : भीम राज की बेटी मैं तो

भारताच्या प्रतिनिधीला बिगुल वाजवली
इंग्लंडमध्ये एका पोरानं, परिषद गाजविली ।।धृ।।

होती सत्ता तुमच्या हाती, नाही मोडल्या जाती पाती
आम्ही होतो तुमच्या पाठी, काय केलं आमच्यासाठी
आम्ही तुम्हाला जिंकून दिलं, पेशवाई हरविली ।।१।।

सनातनी हिंदू लोक, उच्च नीच दावी धाक
बोलणं माझं रोख ठोक, द्या आम्हाला आमचे हक्क
स्वतंत्र संघ दिला भीमाला, परिषद म्हणाली ।।२।।

गांधीजीनं विरोध केला, केला पुणे करार केला
ते बसले उपोषणाला, हवा संयुक्त संघ आम्हाला
ज्याने त्याने आंबेडकराला सही मागितली ।।३।।

समसमान केला कायदा, असा झाला का कोणी पैदा
नाही केला कोणाशी वायदा, बहुसमाज घेतो फायदा
पंढरीनाथा लाल दिव्याची, गाडी सजवली ।।४।।

रमाबाईचा कडकडीत उपवास

चाल : बानु तुला देऊ कुणाच्या घरी गं

महाड गावी मोर्चा, नेलाय गं भिमानं
कडकडीत उपवास केला रमानं ।।धृ।।

नाही घेतलं पाणी ते तोंडी
रस्त्यानं पाहता झुंडीच्या झुंडी
जिकडे तिकडे आरोळ्या येती जोमानं ।।१।।

गागरु गेल्या रमाई माता
धोका भिमाच्या जीवाला होता
आळवू लागल्या देवाला त्या समान ।।२।।

साहेब तुम्ही आहेत राजं
कुंकू आहे सौभाग्य माझं
दिन दुबळ्याचं धनी येऊ दे सुखानं ।।३।।

तिळतीळ रमा झुरली मनी
तिचीच वाणी राहीन जनी
पंढरीनाथा सांग हे सारं दमानं ।।४।।

राबली राबली रमाई राबली

चाल : भारतरत्न रामजीचा बघुन हिरा

कधी फटकून कोणासंगं नाही वागली
राबली राबली रमाई राबली ।।धृ।।

साधा भोळा स्वभाव होता अंतरी
दिसे गुणाने वागाया होती सत्वरी
बोलण्याची सव तिला होती चांगली ।।१।।

हिनवीले बयाने रमाला किती
नाही ऐकलं कोणाचं ठेविली निती
कधी कामात नाही ती सिनली ।।२।।

होती चिंता रमाला परिवाराची
सदा दु:खात राहिली, पत्नी भिमाची
झोप नसे विचारात ती जागली ।।३।।

थोर पुज्य मानीले पतीला तिनं
जन सेवेत दिली रमाने साथ
पंढरीनाथा म्हणे अशी होती माऊली ।।४।।

आम्रपाली बुद्धाला शरण गेली

चाल : गुलाबाची लाली बसे गोच्या गाली

शृंगारल्याली रथ स्वर झाली
गौतमाच्या दर्शनाला आली आम्रपाली ।।धृ।।

आम्रवनाच्या आंब्याखाली
भोजनास यावे विनंती केली
मुक संमती घेता परत निघाली ।।१।।

लिच्छवीची गांधी वैशाली मधी
दे गं आम्रपाली भोजनाची संधी
काही न मानीता, उपासिका झाली ।।२।।

होता दुष्काळ किती, पाऊस गेला
गौतमाचे पाऊल पडता, वर्षाव झाला
राजाची प्रज्ञा आनंदून गेली ।।३।।

जगाला मिळाले, गौतमाचे भाग्य
पंढरीनाथा चरणाशी लागे
सुत्रपाठ गातो सकाळ सायंकाळी ।।४।।

धम्माप्रमाणं वागा

चाल : सोळावं वरीस धोक्याचं गं

चला जाऊ गं बुद्धाच्या विहारी, महिला मंडळाला सांगायचं
धम्माच्या प्रमाणं वागायचं गं, धम्माच्या प्रमाणं ।।धृ।।

अंधज्ञानाच्या पोटी कोणाला देऊ नका गं दोष
खुळ्या भावना सोडून द्या गं काढून टाका रोष
बौद्ध धम्म समजून घ्या गं खरं आहे ते बोलायचं ।।१।।

महिला मंडळात कोणी या गं मैत्री भाव शिका गं
प्रेम देऊनी प्रेम घ्या गं करुणा शाली व्हा गं
नाही आल्या विहारी कोणी, स्वत: कामाला लागत्याचं गं ।।२।।

बुद्ध धम्म आणि संघाची दिलेली आज्ञा पाळा
संसार आपला सुखी कराया लोभी विचार टाळू
नको लालसा मी पणाची शिल आपण पाळायचं ।।३।।

गौतमीनं महिला मंडळ, नेलयं धम्म पशानी
प्रचाराचं कार्य केलं स्वतंत्र्य मतांनी
पंढरीनाथा तुझं कर्तव्य पुन्हा पुन्हा ते सांगायाचं ।।४।।

जयंती गीत

चाल : स्वतंत्र

आला गं मुराळी भाऊ आला
जयंतीच्या सणाला बाई जयंतीच्या सणाला ।।धृ।।

थकले माझे डोळे, पाहता पाहता वाट
लई दूर आहे बाई चढूनी आला घाट
करते विनंती घरच्या धन्याला, घरच्या धन्याला ।।१।।

आईची आहे माया मजवरी आहे छाया
सणाच्या निमीत्ताने जाते गं मी भेटाया
टळणार नाही केल्या वायद्याला केल्या वायद्याला ।।२।।

सन वर्षाची जयंती लेकी बाळी त्या जयंती
बाळ पणाच्या मैत्रिणी एकमेकीच्या साथी जी
येतील मजला भेटायला बाई येतील मजला भेटायला ।।३।।

गाव पंढरीनाथाचं आहे मराठवाड्यात
होती साजरी जयंती साऱ्या भारत देशात
झाला हर्ष माझ्या मनाला, माझ्या मनाला ।।४।।

माणसाने माणसासारखं वागावं

चाल : स्वतंत्र गझलप्रमाणे

कती सांगू तुला मी भल्या माणसा
खोटे कधी कोणाशी तू बोलू नको
जन्म माणवाचा तुला येथे लाभला
कधी निंदा कोणाची तू करु नको ।।धृ।।

कोणाला तू दिले कोणाचे घेतले
नको बदलून जाऊ जन म्हणे चांगले
नाते रक्ताचे कधी तू इसरु नको
स्वार्थासाठी तू भांडण भांडू नको ।।१।।

घर गर्वाचे बांधून राहशी तू
राग लोभाच्या अग्नीत जळशी तू
मग दोष कोणाला तू देऊ नको
कधी शंका कोणावर घेऊ नको ।।२।।

तुच तुझ्या कर्तव्याचा आहेस साथी
पाप पुण्याचे माप आहे तुझ्याच हाती
कधी कोणाशी बेईमानी करु नको
दुर्जनांच्या संगतीत तू राहू नको ।।३।।

सदा सर्वदा चांगले तू करावे
मरणानंतर किर्ती रुपी उरावे
पंढरीनाथा गाऱ्हाणे घालू नको
वाट सोडून वाकडा तू जाऊ नको ।।४।।

किर्ती सुगंध आहे

चाल : शांती दूतास माझ्या हृदयात भाग आहे

आज उद्या मलाही सोडून सर्व काही सोडून
जाणे आहे तुलाही जाणे आहे मला ही ।।धृ।।

सुखाच्या संसारात दु:खाला नाही अंत
आपल्याच स्वार्थासाठी कोणाची नाही खंत
येतो तसाच जातो संगतीला काही नाही ।।१।।

अनित्य आहे रुप कण कण झिजून जाते
केळीचे तुटता पाले सर्वच तोडी नाते
मलीन मन आपले, भान कोणाला नाही ।।२।।

क्षणभंगूर जीवन जाईल व्यर्थ वाया
करावे साथ काही, लयास जाते काया
थरथरा काप होई, म्हातारपणी तुलाही ।।३।।

मरणाच्या आधी कर, पंढरीनाथा काही
दुनियात सोधूनी पाहे, कोणी कोणाचे नाही
किर्ती सुगंध आहे, आठवण त्याची राही ।।४।।

आत्म्याचा पुर्नजन्म होतो का?

चाल : मासुळी बोले आपल्या पिलाला

कोण मरतो तेथे कोण जगतो
पुर्नजन्म कशाचा कोण घेता ।।धृ।।

चार धातूचे बांधीले घर
नव दरवाजे आहे नक्षदार
त्या दारातूनी कोण जातो येतो ।।१।।

पंचइंद्रिया अनुभव घेता
त्याचा उपभोग कोण आहे करता
ज्ञान तत्वाने कोण जानीतो ।।२।।

रुप वेदना संज्ञा संस्कार
जागा होतात ज्ञान विकार
पंचस्कंद हे तृष्णेत न्हातो ।।३।।

जीवनातले हे सर्व कर्म
पंढरीनाथा जानावा धर्म
तेव्हा बीजाचा पुर्नजन्म होतो ।।४।।

बोधिसत्वाची पवित्र भूमी

चाल : परदेशी परदेशी जाना नहीं

घरधनी घरधनी दावा मला
बोधिसत्वाची ती पवित्र भूमी
बाबा भिमाचे जन्मस्थान
सांगतात लोक महू गाव ठिकाण।।धृ।।

पाणी पाणी करता कंठ सुकला
ओंजळ भरण्या कोणीच नाही उठला
महाडच्या तळ्यावर गर्जले भीम
पाजीले पाणी खुले केले विद्वान ।।१।।

येवल्यामध्ये बाबा भिम बोलले
सनातन्यांचे घन घाव तोलले
घोषणा केली धर्मांतराची
ती मुक्ती भूमी आहे बोद्ध जनाची ।।२।।

नागपूरची दिक्षा भूमी गाजली
तेथे बाबाची सत्क्रांती वाढली
त्रिसरणाचा पंचशिलेचा
मंत्र महान ऐकूनी हो कानी ।।३।।

दादर चैत्यभूमी मजला जाऊ द्या
तेथे बाबांची अस्थी दर्शन घेऊ द्या
पंढरीनाथा उभा भेटीसाठी
जयभिम घेता आनंद मिळू द्या ।।४।।

एकीचा आवाज उठवा

चाल : मासूळी बोले आपल्या पिलाला

संघशक्तीचा आवाज उठवा
मग भिम जयंती नटवा ।।धृ।।

झाला माणूस जो गुमानी कोणी राहीला नाही ईमानी
राज्यकर्त्याला करुन सलामी, विकला समाज केली दलाली
हे घरोघर जाऊनी पटवा ।।१।।

केले पक्षाचे वेगळेच गट, झाली समाजात फाटाफुट
यांच्या विचारात आहे तुट, गेले विसरुन भल्याची वाट
हे आपसात भांडण मिटवा ।।२।।

घराघरात पुढारी झाले, जे मिळाले ते घेतले
समाजाला तसेच झोपविले, असे कितीक सांगू दाखले
ती स्वार्थाची खुर्ची हटवा ।।३।।

करा संघटना बंधू भावाची, एकी पंरीनाथा जनाची
तेथे हिंमत नाही कोणाची, करा जयंती बा भिमाची
शिका संघर्ष भिमाचा आठवा ।।४।।

विद्यापिठाला गाजतयं गं

चाल : जशी दुधात साखर

विद्यापिठाला साजतयं गं, नाव बाबासाहेबाचं
किती शोभून दिसतयं गं ।।धृ।।

मी डोळ्यानं पाहिलं, ते नागसेन वन
आजूबाजूनं परिसर आहे बुद्धाचं स्थान
मन तेथेच रमलयं गं ।।१।।

त्याने गरीबाच्यासाठी मिलींद कॉलेज उघडीलं
उच्च शिक्षणासाठी, विद्या पिठ ते वाढीलं
पोर खेड्याचं शिकतोय गं ।।२।।

जेथे तेथेच बाबाचे, फोटे वर्गात पाहिले
मी आनंदाच्या भरी, गुण बाबाचे गाईले
जसा परीस वाटतोय गं ।।३।।

विद्या पिठाच्या द्वाराला, नाव बाबाचं लावीलं
गीत पंढरीनाथानं विद्यापीठाचं गाईलं
बोर्ड दुरुन दिसतयं गं ।।४।।

गेली भीम माऊली

चाल : छुप गया कोई रे

गेली भीम माऊली, दु:खीतांची सावली
कोणाच्या तोंडाकडे पाहू आता
कोणाला दु:ख आमचे सांगू आता ।।धृ।।

कधी जागली कधी अचानक झोपली
कानावरी आवाज येता संकटात धावली
ओलो झाले हातातचे अश्रु पुसीता ।।१।।

लागू दिला नाही कधी ऊन वारा
चिले पिले संभाळीले दिला निवारा
रात्रन् दिन होती तिला आमची चिंता ।।२।।

आज माऊलीची आठवण येते
जसे हृदयावरती घावच पडते
जिव्हाळ्याची होती माय ममता ।।३।।

किती सांगू आईची महान किर्ती
लहान थोर गुण गाती अशी होती मुर्ती
पंढरीनाथा ठाई ठाई शोधिता ।।४।।

THE END